**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०६/०५/२०१९.**

**सजा -खासगाव चे तलाठी श्री.भगवान माणिकराव काकड यांना १०००/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री.भगवान माणिकराव काकड वय 42 वर्ष,व्यवसाय नौकरी- तलाठी, सजा-खासगाव ता.जाफ्राबाद जि.जालना, तहसिल जाफ्राबाद रा.गारगंडी पोस्ट. मेव्हणाराजा ता.देउळगावराजा जि.बुलढाणा |
| २ | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दि.०६.०५.२०१९ रोजी १४.४५ वा. आ.लो.से. श्री.भगवान माणिकराव काकड. तलाठी, यांचे दैनंदिन कामकाजाची खोली आदर्शनगर ,टावर लाईन ,श्री.कळबे यांचा गाळा,जाफ्राबाद ता.जाफ्राबाद. जि.जालना येथे |
| ३ | लाचेची रक्कम | :- | १०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ४ | सापळा अधिकारी | :- | श्री.आर.डी.निकाळजे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार यांनी दि.१५.०४.२०१९ रोजी गोपी शिवार ता.जाफ्राबाद येथील गट नं.२८७मध्ये २४ आर जमीन खरेदी केली होती.त्या शेतजमीनीचा फेर करण्यासाठी खरेदी खताची नक्कल आ.लो.से श्री.भगवान माणिकराव काकड. तलाठी यांच्या कडे दिली होती, त्यानंतर दि.०४.०५.२०१९ रोजी तक्रारदार हे तलाठी श्री.काकड सजा खासगाव यांना भेटून त्यांच्या शेतीचा फेर टाकण्याची विनंती केली असता आलोसे. श्री.काकड , तलाठी यांनी तक्रारदार यांना सदर जमीनीचा फेर ऑनलाईन टाकून, त्या सबंधीची नोटीस तामील करुन ,तसा प्रस्ताव मंडळ अधिकारी यांचेकडे फेर मंजुरी साठी पाठविण्याकरिता १०००/- रुपये लाचेची मागणी करुन, १०००/- रुपये दिल्या शिवाय फेर ऑनलाईन टाकून, त्या सबंधीची नोटीस तामील करुन ,तसा प्रस्ताव मंडळ अधिकारी यांचेकडे फेर मंजुरी साठी पाठविणार नाही. असे सांगीतले. तक्रारदार यांची तलाठी श्री.काकड यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे दि.०६.०५.२०१९ रोजी तक्रार नोंदवली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज रोजी ला.प्र.विभागाने तलाठी श्री.काकड यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणी दरम्याण तलाठी श्री.काकड यांनी तक्रारदार यांचे कडे सदर फेर ऑनलाईन टाकून, त्या सबंधीची नोटीस तामील करुन ,तसा प्रस्ताव मंडळ अधिकारी यांचेकडे फेर मंजुरी साठी पाठविण्याकरिता १०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यांचे आदर्शनगर जाफ्राबाद येथील दैनंदिन कामकाजाची खोलीवर स्विकारण्यास तयार झालेचे निष्पन्न झाले.

त्यावरुन आज दि.०६.०५.२०१९ रोजी श्री.भगवान माणिकराव काकड. तलाठी, यांचे विरुध्द त्यांचे आदर्शनगर येथील दैनंदिन कामकाजाच्या खोली येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता तलाठी श्री.काकड यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष १०००/- रुपये लाचेची मागणी करुन १०००/- रुपयाची लाच स्विकारली असातांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले असुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६, पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना